प्रकरण : पहिले

# संशोधनविषयाचे महत्त्व, संशोधनपद्धती व संशोधनाची साधन-सामग्री

प्रकरण : पहिले

# संशोधनविषयाचे महत्त्व, संशोधनपद्धती व संशोधनाची साधन-सामग्री

१.१ संशोधनविषयाचे महत्त्व

१.२ संशोधनविषयाची साधन-सामग्री

१.३ संशोधनविषयाची व्याप्ती व मर्यादा

१.४ अभ्यासविषयाची उद्दिष्टे

१.५ संशोधनपद्धती

१.६. अभ्यासविषयाची ओळख

१.७ संशोधनविषयाचा आराखडा

१.८ संदर्भ

प्रकरण : पहिले

# संशोधनविषयाचे महत्त्व, संशोधनपद्धती व संशोधनाची साधन-सामग्री

**१**९६० नंतरचा काळ हा मराठी वाङ्मयाच्या दृष्टीने महत्त्वाचा काळ होय. १९४०-४५ पासून साहित्यात होऊ लागलेला बदल १९६० नंतर अधिक स्पष्टपणे दिसू लागला. यातून वेगवेगळे प्रवाह निर्माण झालेले दिसून येतात. त्यामध्ये ग्रामीण, दलित, स्त्रीवादी, जनवादी असे अनेक प्रवाह निर्माण झालेले आहेत. बा. सी. मर्ढेकर, गंगाधर गाडगीळ, अरविंद गोखले, पु.भा. भावे, व्यंकटेश माडगूळकर, शंकर पाटील, द. मा. मिरासदार, आनंद यादव यांनी मानवी जीवनाचे सूक्ष्म भावस्पर्शी चित्रण केलेले आहे. वऱ्हाडातील भाऊ मांडवकर, उद्धव शेळके, मनोहर तल्हार, वामन इंगळे आणि बाजीराव पाटील हेही आपल्या साहित्यातून एक नवीन वैभवशाली अध्यायाची भर घालत होते. सामाजिक वास्तवातून माणसाच्या वाट्याला येणारी परात्मता आणि त्यांची निसर्गदत्त मानवीयता यांच्यातील संघर्षाचे करुण-भीषण नाट्य मनोहर तल्हार यांच्या साहित्यात चितारलेले आहे.

### १.१ संशोधनविषयाचे महत्त्व

स्वातंत्र्योत्तर काळामध्ये बहुजन समाजातील तरुण पिढी शिक्षण घेऊन आपले अनुभवलेले जीवन साहित्याच्या माध्यमातून व्यक्त करू लागली. बहुजनांच्या वाट्याला आलेले सुख-दुःख साहित्याच्या माध्यमातून व्यक्त होत होते. पुणे विद्यापीठात एम.ए.च्या '१९४५ नंतरचे वाङ्मयीन प्रवाह' या पेपरचा आणि 'मेड इन इंडिया : एक अभ्यास' या विषयावर एम.फिल.चा अभ्यास करतेवेळी माझ्या वाचनातील 'माणूस' या कादंबरीने माझे मन हेलावून सोडले. त्यानंतर 'अफलातून', 'शुक्रथेंब', 'अप्रिया', 'अशरीरी' या कादंबऱ्या आणि 'बुढीचं खाटलं', 'तोलरेघ', 'कॅन्सल', 'गोरीमोरी', 'निःसंग', 'दुरान्वय', 'दुजा शोक वाहे' हे कथासंग्रह झपाटल्यासारखे वाचून काढले.

सामान्य माणसाची सुख-दुःखे, त्यांच्या जगण्यातील तीव्र संघर्ष मनोहर तल्हार यांच्या साहित्यातून सहजपणे साकार होतात. त्यांच्या एकूण साहित्यातून सामाजिक, आर्थिक नियतिवादाचे कलात्मक चित्रण आलेले दिसते. मध्यमवर्गीय-उच्चभ्रूवर्गाचे तसेच वऱ्हाडी स्त्रियांच्या व्यथा, तेथील समाजजीवन, नागर श्रमजीवी समाजाचे प्रतिनिधित्व करणारे त्यांचे साहित्य आहे. गेल्या पन्नास वर्षांपासून चित्रपट क्षेत्राशी त्यांचे नाते जोडलेले आहे. १९४९ मध्ये पहिल्यांदा चित्रपट स्तंभलेखन केले. त्यानंतर मराठी-हिंदी चित्रपटांवर भरपूर स्तंभलेखन प्रकाशित झालेले आहे. त्याचबरोबर ललितलेखन, व्यक्तिचित्रणे आणि समीक्षालेखनही केलेले आहे. याचाही शोधप्रबंधात समावेश केलेला आहे.

१९४५ पूर्वीच्या कथेत हरिभाऊ आपट्यांचा पहिला टप्पा व फडके-खांडेकरांचा दुसरा टप्पा असे प्रमुख दोन टप्पे दिसतात. या दोन टप्प्यांपेक्षा वेगळी कथा १९४५च्या आसपास येण्यास प्रारंभ झाला. ही नवकथा जुन्या कथेपेक्षा खूप वेगळी होती. नवकथाकारांनी वाङ्मयाच्या क्षेत्रातील अनेक संकेत झुगारून दिलेले होते. आतापर्यंत जे अनुभव साहित्याचा विषय असूच शकत नाहीत अशी कल्पना होती, त्या अनुभवांतले विषय नवकथाकारांनी आपल्या कथेतून मांडण्याचा यशस्वी प्रयत्न केलेला आहे. या काळात झालेल्या दोन महायुद्धांमुळे मानवाच्या जीवनाला क्षणभंगुरता आलेली होती. पाण्यावरचा बुडबुडा कधी फुटेल याचा काही नेम नसतो तसे मनुष्याचे जीवन केव्हा उद्‌ध्वस्त होईल याचा नेम नव्हता. इतकी अस्थिरता मानवी समाजजीवनात आलेली होती.[१]

याच काळात गरीब, मध्यम व श्रीमंत अशा वेगवेगळ्या पातळ्यांवर जीवन जगणाऱ्या समाजाचे भावविश्व मनोहर तल्हार यांनी आपल्या साहित्यातून साकार केलेले आहे. हातावर पोट असणारी, परिस्थितीने गांजलेली, नियतीने ज्यांचे जगणेच हिरावून घेतलेले आहे, अशी माणसे मनोहर तल्हार यांच्या साहित्याचा केंद्रबिंदू ठरलेली आहेत. त्यांनी अशा समाजातील मानवी मनाचे विविध पदर आपल्या साहित्यातून उलगडून दाखविलेले आहेत. मनोहर तल्हार यांच्या अशा वेगवेगळ्या साहित्यकृतींनी प्रभावित होऊन प्रस्तुत विषयाची निवड केलेली आहे.

## १.२ संशोधनविषयाची साधन-सामग्री

प्रस्तुत संशोधनविषयाच्या अभ्यासासाठी पुढील साधन-सामग्रीचा आधार घेतलेला आहे-

१. मनोहर तल्हार यांचे एकूण वाङ्मयः

अ. कविता : श्वेतांबरी

ब. कथावाङ्मय : 'बुढीचं खाटलं', 'तोलरेघ', 'गोरीमोरी', 'निःसंग', 'कॅन्सल', 'दुजा शोक वाहे', 'दुरान्वय'

क. कादंबरीलेखन : 'माणूस', 'अप्रिया', 'अफलातून', 'शुक्रथेंब', 'अशरीरी'.

ड. स्फुटलेखन : वाङ्मयीन समीक्षा, चित्रपटविषयक समीक्षालेखन, ललित लेख, नभोनाट्य, नियतकालिकांतील लेखन इत्यादी.[२]

## १.३ मनोहर तल्हार यांची प्रत्यक्ष मुलाखत

मनोहर तल्हार यांचे विविधस्वरूपी समग्र वाङ्मय आधारभूत संशोधनाचे साधन म्हणून प्रबंधलेखनासाठी उपयोगात आणून, आवश्यक त्या ठिकाणी संदर्भांची नोंद घेण्यासाठी अन्य संदर्भग्रंथांचा दुय्यम साधने म्हणूनही उपयोग केलेला आहे.

मनोहर तल्हार यांच्या प्रत्यक्ष मुलाखतीतून त्यांचा जीवनवृत्तांत, त्यांची वाङ्मयीन वाटचाल, त्यांच्या वाङ्मयनिर्मितीमागील प्रेरणा व त्यांचे मराठी वाङ्मयातील योगदान इत्यादीविषयी माहिती प्राप्त करून घेतली.

परिश्रमपूर्वक व अभ्यासपूर्ण संशोधन करण्याची मनाची तयारी करूनच प्रस्तुत विषय निवडलेला आहे. दुसऱ्या महायुद्धानंतरचा म्हणजे १९४५ ते १९६० हा कालखंड नवसाहित्याच्या उदयाचा काळ होय; तर १९६० नंतरचा काळ विस्तारकाळ होय. या नवसाहित्याचे वेगळेपण समजण्यासाठी पूर्वीच्या साहित्याचा अभ्यास केलेला आहे. या अभ्यासासाठी मासिके, विशेषांक, नियतकालिके, वृत्तपत्रे इत्यादी साधनांची उपलब्धता झालेली आहे.

इ.स. १९४७ मध्ये भारत स्वतंत्र झाला. २६ जानेवारी १९५० पासून भारतीय, त्याचबरोबर मराठी लोकांना राज्यघटनेप्रमाणे हक्क प्राप्त झाले. स्वातंत्र्यामुळे लोकांच्या अपेक्षा वाढत गेल्या. त्याचबरोबर शिक्षणामुळे स्वातंत्र्य, समता, बंधुता अशा नव्या मूल्यांचा परिचय होऊ लागला.

याचाही संशोधनकार्यात समावेश केलेला आहे. त्याचबरोबर मनोहर तल्हार यांचे प्रकाशित साहित्य, स्फुटलेखन, ललितलेखन, समीक्षालेखन आणि चित्रपट स्तंभलेखन यांची वाङ्मय प्रकारांनुसार आस्वादक पद्धतीने मांडणी केलेली आहे. मनोहर तल्हार यांच्या लेखनावर झालेल्या वेगवेगळ्या समीक्षलेखनाचाही अभ्यास केलेला आहे. यासाठी विद्यापीठातील ग्रंथ, इतर ग्रंथालये, मोठी वाचनालये आणि महाविद्यालयीन ग्रंथालयांचा आधार अभ्यासासाठी घेतलेला आहे.

**१.४ संशोधनविषयाची व्याप्ती व मर्यादा**

प्रस्तुत संशोधनविषयाचा अभ्यास करताना मनोहर तल्हार यांचे समग्र वाङ्मय केंद्रस्थानी ठेवून, त्यांच्या वाङ्मयलेखनातील विविध वाङ्मयप्रकार जसे - कविता, कथा, कादंबरी, ललितलेखन, समीक्षालेखन यांच्या स्वरूप-विशेषांची चिकित्सा करण्याचा प्रयत्न केलेला आहे. ही वाङ्मयीन चिकित्सा करताना काही समकालीन लेखकांच्या वाङ्मयलेखनाचीही नोंद घेण्याचा प्रयत्न केलेला आहे.

संशोधनविषयाचा सखोल अभ्यास करता यावा, संशोधनविषयातील महत्त्वाचे पैलू प्रकाशात आणावेत यासाठी अभ्यासविषयाला काही मर्यादा हेतुतः स्वीकारलेल्या आहेत, त्या अशा-

१. मनोहर तल्हार यांच्या डिसेंबर २०१० पर्यंत प्रकाशित झालेल्या वाङ्मयाचीच निवड प्रस्तुत अभ्यासासाठी केलेली आहे.

२. मनोहर तल्हार यांचे प्रकाशित वाङ्मय : कविता, कथा, कादंबरी व स्फुटलेखन यांची वाङ्मयीन चिकित्सा, समीक्षा करण्याचे प्रस्तुत अभ्यासात हेतुतः ठरविले आहे.

मनोहर तल्हार यांनी नाटक हा वाङ्मयप्रकार सोडून समाजजीवनातील अनेक विषय व वाङ्मयप्रकार हाताळलेले आहेत. त्यांच्या समग्र साहित्याचा चिकित्सक अभ्यास वाङ्मय-प्रकारांनुसार या शोधप्रबंधात केला असून, या अभ्यासाच्या कालावधीत म्हणजे मार्च २०१० पर्यंत प्रकाशित होणाऱ्या साहित्याचा विचार या अभ्यासासाठी केलेला आहे. प्रत्येक प्रकरणाच्या शेवटी मनोहर तल्हार यांच्या वाङ्मयाचे मूल्यमापन केलेले आहे.

**१.५ अभ्यासविषयाची उद्दिष्टे :**

'मनोहर तल्हार यांच्या समग्र साहित्याचा चिकित्सक अभ्यास' हा विषय पुढील गृहीतके

डोळ्यासमोर ठेवून अभ्यासलेला आहे.

- मनोहर तल्हार यांच्या समग्र साहित्याचे स्वरूप निर्मितिप्रक्रियेच्या अनुषंगाने शोधणे.
- त्यांच्या एकूण साहित्यातील नवतेचे व प्रयोगशीलतेचे स्वरूप शोधणे.
- मनोहर तल्हार यांच्या साहित्यातील वास्तव जाणिवांचा शोध घेणे.
- मनोहर तल्हार यांच्या साहित्याच्या निर्मितीमागील प्रेरणांचा शोध घेणे.
- एक लेखक म्हणून मनोहर तल्हार यांच्या कथालेखनाचा विश्लेषणात्मक अभ्यास करून कादंबऱ्यांची वैशिष्ट्ये स्पष्ट करणे.
- त्यांच्या साहित्यातील जीवनविषयक दृष्टिकोनाचा शोध घेणे.
- मनोहर तल्हार यांच्या वाङ्मयीन योगदानाची नोंद करून, त्यांच्या समग्र साहित्याच्या मर्यादा स्पष्ट करणे.

**१.६ संशोधनपद्धती**

प्रस्तुत संशोधनविषयाचा अभ्यास करताना खालील संशोधनपद्धतींचा स्वीकार करण्यात आला-

१. वर्गीकरणात्मक संशोधनपद्धती

२. अन्वेषणात्मक संशोधनपद्धती

३. तुलनात्मक संशोधनपद्धती

४. विश्लेषणात्मक संशोधनपद्धती

५. संश्लेषणात्मक संशोधनपद्धती

**१. वर्गीकरणात्मक संशोधनपद्धती**

प्रस्तुत संशोधनविषयाचा अभ्यास करताना वर्गीकरणात्मक संशोधनपद्धतीचा अवलंब करून, मनोहर तल्हार यांच्या एकूण वाङ्मयाचे पुढीलप्रमाणे वर्गीकरण करण्यात आले. वाङ्मयप्रकार हे वर्गीकरणाचे तत्त्व येथे स्वीकारले.

१. कविता

२. कथा

३. कादंबरी

४. ललितलेखन

५. समीक्षालेखन

६. स्फुटलेखन

प्रकाशनाचे माध्यम हे तत्त्व आधारास घेऊन, मनोहर तल्हार यांच्या प्रकाशित झालेल्या एकूण वाङ्मयाचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे केलेले आहे.

१. ग्रंथरूपाने प्रकाशित वाङ्मय : कविता, कथा, कादंबरी

२. नियतकांलिकातून प्रकाशित झालेले लेखन : कविता, कथा, ललितलेखन, समीक्षालेखन.

३. वृत्तपत्रांच्या पुरवण्यांतून प्रकाशित झालेले लेखन.

४. आकाशवाणीवरून प्रसारित झालेले वाङ्मय.

मनोहर तल्हार यांच्या समग्र वाङ्मयाचा अभ्यास करताना, त्यांच्या वाङ्मयीन कृतींतील अभ्यासघटकांचेही वर्गीकरण करण्यात आले, ते असे-

१. कवितेतील अभ्यासघटक : कल्पना, विचार, रचनाविशेष, अभिव्यक्ती इ.

२. कथेतील अभ्यासघटक : रचना आणि आशय, घटना-प्रसंग, व्यक्तिरेखा, भाषा आणि लेखनशैली.

३. कादंबरीलेखनातील अभ्यासघटक : प्रादेशिकता, स्त्री-पुरुष व्यक्तिचित्रण, कथासूत्रे, भाषा, निवेदन-वर्णन शैली.

४. स्फुटलेखनातील अभ्यासघटक : वैचारिकता, लालित्य, समीक्षात्मकता, भाषा, निवेदनशैली.

मनोहर तल्हार यांच्या समग्र वाङ्मयाचे व त्यातील अभ्यासघटकांचे वरीलप्रमाणे वर्गीकरण करून, अभ्यासघटकांची वाङ्मयीन चिकित्सा करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**२. अन्वेषणात्मक संशोधनपद्धती**

अन्वेषणात्मक संशोधनपद्धतीच्या स्वीकारातून मनोहर तल्हार यांच्या विविधस्वरूपी वाङ्मयीन कृतींच्या मूल घटकांचा वेध घेता आला. त्यांच्या वाङ्मयनिर्मितीमागील प्रेरणा, कथा-कादंबरीतील व्यक्ती, त्यांचे जगणे, सभोवतीच्या परिसराशी त्यांचे असलेले नाते, मनोहर

तल्हार यांच्या वाङ्मयीन कृतीतील त्यांचे स्थान आणि त्यांतून वाङ्मयीन कृतीला लाभलेले रूप इत्यादी बाबींची चिकित्सा करण्यात ही संशोधनपद्धती उपयुक्त ठरली.

**३. तुलनात्मक संशोधनपद्धती**

मनोहर तल्हार यांच्या समग्र वाङ्मयाचा अभ्यास करताना काही अभ्यासघटकांच्या संदर्भात तुलनात्मक संशोधनपद्धतीचाही उपयोग करण्यात आला. उदा.

१. मनोहर तल्हार यांची कविता व समकालीन कविता.

२. मनोहर तल्हार यांची कथा व समकालीन कथावाङ्मय.

३. मनोहर तल्हार यांचे कादंबरीलेखन व समकालीन कादंबरी.

४. मनोहर तल्हार यांच्या कथेतील व्यक्ती व त्यांच्या कादंबरीतील व्यक्ती.

५. मनोहर तल्हार यांच्या लेखनाची भाषा-बोलीभाषा व प्रमाण मराठी भाषा.

६. मनोहर तल्हार यांच्या वाङ्मयाचे वेगळेपण.

या स्वरूपाच्या तुलनात्मक अभ्यासातून मनोहर तल्हार यांच्या वाङ्मयाचे समकालीन वाङ्मयाच्या तुलनेत असलेले वेगळेपण स्पष्ट करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**४. विश्लेषणात्मक संशोधनपद्धती**

विश्लेषणात्मक संशोधनपद्धतीच्या आधारे मनोहर तल्हार यांच्या एकूण वाङ्मयातील अभ्यासघटकांचे तर्कसुसंगत विश्लेषण करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

१. मनोहर तल्हार यांच्या कवितेतील आशय व अभिव्यक्ती, भावनाविष्कार, कल्पनासौंदर्य, योजलेल्या शब्दांची अर्थपूर्णता, अर्थगर्भता इत्यादी.

२. वातावरणनिर्मिती

३. कथा-कादंबरीतील व्यक्ती, घटना-प्रसंग

४. भाषा- बोलीभाषा

५. निवेदन-वर्णनशैली

६. लेखनातील प्रयोगात्मकता

७. वास्तव जाणिवा

८. जीवनदृष्टी इत्यादी.

### ५. संश्लेषणात्मक संशोधनपद्धती

संशोधनविषयाचे केलेले वर्गीकरण, त्यांतून निवडलेले अभ्यासघटक, त्यांचे केलेले विश्लेषण, अभ्यासघटकांची वाङ्मयीन चिकित्सा या आधारे तर्कसंगत विवेचनासाठी संश्लेषणात्मक अभ्यासपद्धतीचा उपयोग करण्यात आला. त्यामुळे मनोहर तल्हार यांच्या समग्र वाङ्मयाची समीक्षा करता आली. संश्लेषणात्मक संशोधनपद्धतीच्या आधारे मनोहर तल्हार यांच्या समग्र वाङ्मयाच्या पुढील पैलूंवर चर्चा व विवेचन करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

१. मनोहर तल्हार यांच्या कवितेतील काव्यगुण

२. सामाजिक, ग्रामीण, कौटुंबिक, मध्यमवर्गीय जाणिवेच्या कथा

३. स्त्री-जीवनचित्रण

४. व्यक्तिचित्रणे

५. लेखकाची कथेची निवेदनशैली व भाषाशैली

६. मनोहर तल्हार यांचे कादंबरीलेखन

७. प्रादेशिकता, निसर्ग

८. स्त्री-पुरुष व्यक्तिरेखा

९. घटना-प्रसंग

१०. कादंबरीचे रचनातंत्र

११. भाषा व निवेदनशैली

१२. समाजजीवनचित्रण

१३. मनोहर तल्हार यांच्या स्फुटलेखनातील विविधता

१४. समीक्षालेखन, ललितलेखन, व्यक्तिचित्रे इत्यादी

१५. मनोहर तल्हार यांचे मराठी वाङ्मयातील योगदान

वाङ्मयाच्या संशोधनात उपयुक्त असणाऱ्या अशा विविध संशोधनपद्धतींचा स्वीकार करून, मनोहर तल्हार यांच्या समग्र वाङ्मयाच्या स्वरूप-विशेषांचा व त्यांच्या वाङ्मयाच्या मराठी वाङ्मयातील योगदानाचा अभ्यास करण्याचा प्रयत्न प्रस्तुत प्रबंधात केलेला आहे.

**१. ७ अभ्यासविषयाची ओळख :**

मनोहर तल्हार यांच्यातील लेखक समजणे म्हणजे एखादा हिमनग दुरून पाहणे आहे. समुद्राच्या पृष्ठभागावर तरंगणाऱ्या हिमनगाविषयी बोलता बोलताच दमछाक व्हावी आणि पृष्ठभागाखालच्या उर्वरित हिमनगाच्या वजन, उंची, लांबी, क्षेत्रफळ यांविषयी अनेकवेळा बेरीज, वजाबाकी, गुणाकार, भागाकार करूनही त्यांचा अंदाजही सांगता येऊ नये... असे हे लेखक आहेत. कारण त्यांच्या लेखनात विविध विषयांना स्पर्श झालेला दिसतो. उदा. सायकल रिक्षा चालवणाऱ्याच्या जीवनापासून चित्रपटक्षेत्रात काम करणाऱ्या कलावंतापर्यंत, महाविद्यालयात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांपासून शेतावर मजुरी करणाऱ्या स्त्रियांचे चित्रण जसे त्यांच्या लेखनात आलेले आहे. तसेच दिग्दर्शक अभिनेता राजकपूर ते गानकोकिळा लता मंगेशकर तसेच मॅजेस्टिक प्रकाशनचे संस्थापक श्री. केशव कोठावळे आदींची व्यक्तिचित्रणे आहेत. समाजजीवनाचे वास्तव चित्रण करणाऱ्या कथा-कादंबऱ्या आणि कवितांवर समीक्षा लिहिली आहे. काही लेखक जेव्हा समाजाचे खोटे चित्रण उभे करतात तेव्हा मनोहर तल्हार त्या लेखकांवर टीका करण्यास मागेपुढे पाहत नाहीत. प्रतिमा इंगोले याच्या 'हजारी बेलपानं' कथासंग्रहाची समीक्षा लिहिताना ते स्पष्ट नोंद करतात : ''प्रतिमा इंगोले यांच्या कथेत वऱ्हाडी जीवनाचे 'वरवर'चे सारे आले आहे. अंतरंग राहून गेले आहे. वऱ्हाडीत जगणारे, त्यांचे कष्टमय जीवन, कष्ट करणारी वऱ्हाडी मुले- माणसे- बाया, म्हातारे, नातीगोती सांभाळताना निर्माण झालेले दारिद्र्यातले ताणतणाव-मनाची कुत्तरओढ, मनातले कढ यांचा आविष्कार असणाऱ्या कथा त्यांनी लिहाव्यात, आहे त्या कथांच्या घाटाच्या अंडकोषातून बाहेर पडावे व नुसत्या वऱ्हाडीच नाही तर चिरंतन मूल्य लाभलेल्या भावनांचा आविष्कार करणाऱ्या, मनाला पिळवटून टाकणाऱ्या कथा लिहाव्यात.''[३] यातून त्यांचा जीवनविषयक दृष्टिकोन दिसून येतो. कोणत्याही विषयावर वाचकांची फसवणूक न करता, त्यांना मूळ विषयाच्या गाभ्यापर्यंत नेण्याचा प्रामाणिक प्रयत्न मनोहर तल्हार करतात.

मनोहर तल्हार यांची 'न खुपसणारा खंजीर' ही कथा पुण्याच्या 'माणिक' मासिकात जुलै १९५० मध्ये प्रसिद्ध झाली; तर 'स्टंट बोलपट' हा चित्रपट स्तंभलेख अमरावतीच्या 'चंदेरी चादर' या सिनेपत्रिकात १ ऑक्टोबर १९४९ रोजी प्रसिद्ध झाला. त्यांची 'माणिक' मासिकात जून

१९५२ मध्ये 'विलक्षण सूड' ही कादंबरी प्रकाशित झाली; पण ही कादंबरी पुस्तकरूपात प्रकाशित झालेली नाही. इ.स. १९६३ मध्ये 'माणूस' ही स्वतंत्र कादंबरीच्या रूपात प्रकाशित झालेली आहे. इ.स. १९५५ मध्ये वऱ्हाडी भाषेतील 'बयनाबाई' ही पहिली कथा प्रकाशित झालेली आहे. येथूनच त्यांच्या वेगवेगळ्या वाङ्मयप्रकारांच्या लेखनाला सुरुवात झालेली दिसते. त्यांच्या या कथा सुषमा, कथासृष्टि, प्रतिष्ठान, यशवंत, सविता, सुदर्शन, युगवाणी, कल्पना, वसुधा, छंद, सत्यकथा, मराठवाडा, लोकसत्ता, लोकमत, गावकरी, सकाळ, स्वराज्य, मातृभूमी, हिंदुस्थान या दर्जेदार अशा साहित्य-समीक्षेला वाहिलेल्या नियतकालिकांतून प्रकाशित झालेल्या आहेत. त्याचबरोबर 'माणूस', 'अप्रिया', 'अफलातून', 'शुक्रथेंब', 'अशरीरी' या पाच कादंबऱ्या आजपर्यंत प्रकाशित झालेल्या आहेत. कादंबरीलेखनाची प्रेरणा ही व्यंकटेश माडगूळकर यांच्या 'बनगरवाडी' या कादंबरीपासून घेतली असून, या वाचनामुळे त्यांच्या मनातील रिक्षावाला जागा झाल्याचे ते सांगतात. पन्नास वर्षांमध्ये त्यांच्या जवळपास दोनशे कथा प्रकाशित झालेल्या आहेत.

मनोहर तल्हार यांचा मूळ पिंड कथाकाराचा आहे. लेखक हा वेगवेगळे प्रयोग करतो, त्याप्रमाणे त्यांनी कादंबरीलेखनाचे यशस्वी प्रयोग केलेले आहेत. मराठी साहित्यात कविता, कथा, कादंबरी, चित्रपट स्तंभलेखन, ललितलेखन, व्यक्तिचित्रण असा समांतर प्रवास घडलेला आहे. हे विविध स्वरूपाचे लेखन महत्त्वाची वाटते. म्हणून प्रस्तुत प्रबंधात आजपर्यंत प्रकाशित तसेच उपलब्ध झालेल्या कथा, कादंबरी, ललितलेखन, चित्रपटलेखन, समीक्षालेखन अशा समग्र साहित्याचा अभ्यास केला.

प्र. ल. गावंडे यांनी, 'विशिष्ट ग्रंथकाराचा अभ्यास' या लेखात म्हटले आहे : ''विशिष्ट ग्रंथकाराच्या विशेष अभ्यासाच्या प्रसंगी चरित्रात्मक समीक्षा, ऐतिहासिक समीक्षा व आस्वादक समीक्षा यांचा उचित मेळ घालावयास हवा. आस्वादक समीक्षापद्धतीचा अधिकाधिक अवलंब करून, ग्रंथकाराच्या साहित्याचा विचार प्राधान्याने व्हावयास हवा. खरोखरच ज्या ठिकाणी आकलनात भर पडते आहे असे वाटेल, तेथे चरित्रात्मक व ऐतिहासिक समीक्षापद्धती उपयोगात आणता येतील. या दोन्ही पद्धतींचे कार्य आकलनात साहाय्यभूत होणे एवढेच आहे. मूल्यमापनास प्रवृत्त होणे वा अन्य निष्कर्षाप्रत पोहोचणे, हे नव्हे. या तीन पद्धतींचा समतोल अवलंब ग्रंथकाराच्या

विशेष अभ्यासास अधिक उपयोगी ठरेल.''[४] या विविध पद्धतींनुसार मनोहर तल्हार यांच्या साहित्याचा अभ्यास करता येतो.

मनोहर तल्हार या लेखकाने वाङ्मयविषयक अनेक पायंडे पाडले असून, अनेक नवे प्रश्न उपस्थित केलेले आहेत. त्यांचे कथा, कादंबरीलेखन, चित्रपट स्तंभलेखन, समीक्षालेखन ललितलेखन आजपर्यंत सुरू आहे. मनोहर तल्हार यांच्या कोणत्याही एका वाङ्मयप्रकाराला रूढ अर्थाने त्या त्या वाङ्मयप्रकारात अंतर्भूत करणे चाकोरीला धरून होणार नाही.

मराठी साहित्यात कविता, कथा, कादंबरी, ललितलेखन, समीक्षालेखन, स्फुटलेखन यांचा जो आकृतिबंध मानला जातो, त्या आकृतिबंधाच्या वर्तुळात मनोहर तल्हार यांचे लेखन समाविष्ट करण्यासंबंधी चर्चा झाली आहे, ती व्यापक प्रमाणात नसून, काही निवडक समीक्षकांनी मर्यादित स्वरूपात भाष्य केलेले आहे. उ. रा. गिरी, रवींद्र शोभणे, जयंतकुमार बंड, स. गं. मालशे, श्री. मा. कुलकर्णी, सुहासिनी कीर्तीकर, माधव तेलंग, प्रा. माधवी जुमडे, भगवान ठग, गंगाधर महाम्बरे, कृष्णा चौधरी, श्रीपाद भालचंद्र जोशी, सुलभा हेर्लेकर, र. बा. मंचरकर, डॉ. मधुकर वाकोडे, डॉ. आनंद यादव, डॉ. नागनाथ कोत्तापल्ले (पत्रव्यवहार), शुभांगी संत, रमेश पिंजरकर, प्रा. वसंत दावतर, वसंत शिरवाडकर, श्रीकृष्ण ठाकूर, शंकर सारडा, प्रा. ल. ग. जोग, वि. शं. पारगावकर, मधुकर कुलकर्णी, वसंत शिरवाडकर इत्यादी समीक्षकांनी मनोहर तल्हार यांच्या साहित्यावर भाष्य केलेले आहे. हे भाष्य साहित्य-समीक्षेला वाहिलेल्या दर्जेदार नियतकालिकांतून, दै. लोकमत, रविवार पुरवणी अंक आणि इतर ठिकाणांहून प्रकाशित झालेले आहे. उदा. महाराष्ट्र टाइम्स, आलोचना, रविवार लोकसत्ता, रहस्यरंजन, साधना, तरुण भारत, युगवाणी, अक्षरवैदर्भी, नागपूर पत्रिका, अस्मितादर्श, मैत्रीवार्ता, वीणा, शब्दरंजन, नंदा, मेनका, इ; पण या समीक्षालेखनाला काही मर्यादा पडतात.

मराठी साहित्य क्षेत्रात मनोहर तल्हार यांचे स्थान निश्चित करण्यासाठी त्यांच्या साहित्याची वाङ्मयीन गुणवत्ता, साहित्यनिर्मितीमागील प्रेरणा, त्यांचा जीवनविषयक दृष्टिकोन इत्यादींचा विस्तृत अभ्यास करण्याचा प्रयत्न केलेला आहे. पीएच.डी.च्या संशोधनाचा विषय म्हणून त्यांच्या साहित्याचा अभ्यास आजपर्यंत झाला नाही. मराठी साहित्य क्षेत्राला नवे परिमाण देऊ पाहणाऱ्या

या लेखकाच्या लेखनातून दिसणाऱ्या वाङ्मयीन व्यक्तिमत्त्वाचा शोध घेणे महत्त्वाचे आहे.

प्रस्तुत प्रबंधात मनोहर तल्हार यांच्या समग्र साहित्याचा अभ्यास करताना पुस्तकरूपाने, मासिकांमधून संशोधनाच्या मूलभूत पद्धतीला अनुसरून, त्यांच्या विविध ठिकाणी प्रकाशित झालेल्या संपूर्ण साहित्याचे संकलन, वर्गीकरण आणि विश्लेषण करून, निष्कर्ष मांडायचे ठरविले आहे.

प्रस्तुत प्रबंधाची विभागणी सात प्रकरणांत केली असून, प्रबंधाच्या पहिल्या प्रकरणात अभ्यासविषयाची निवड, साधन-सामग्रीची जमवाजमव, अभ्यासविषयाची व्याप्ती व मर्यादा, अभ्यासाची गृहीतके यांचे विवेचन केले आहे. दुसऱ्या प्रकरणामध्ये मनोहर तल्हार यांच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण कशी झाली, बालपण कशा स्वरूपाचे होते. विद्यार्थिजीवनातील आदर्श लेखक आणि त्यांची कोणती पुस्तके वाचनात आली, त्यांच्या साहित्यलेखनाच्या प्रेरणा कोणत्या आहेत, त्यांना कोणकोणते बहुमान व सन्मान मिळाले आणि त्यांनी भूषविलेली पदे याचा विस्तृत आढावा घेण्यात आलेला आहे. तिसऱ्या प्रकरणामध्ये मनोहर तल्हार यांच्या कवितांचे आशयानुसार वर्गीकरण करून, आस्वादात्मक पद्धतीने मांडणी केलेली आहे. 'श्वेतांबरी' या कवितासंग्रहाच्या पाठीमागे एका मोठ्या कालपटाशी कवीच्या अनुभवविश्वाचे धागे गुंतलेले आहेत. एखाद्या सराईत हाताने एखादी कलाकृती निर्माण करावी, तशी नितळ पारदर्शक कविता 'श्वेतांबरी'च्या रूपाने मनोहर तल्हार यांनी दिली आहे. चौथ्या प्रकरणामध्ये मनोहर तल्हार यांच्या कथेचा आशय व अभिव्यक्ती या दोन्ही अंगांनी अभ्यास केला असून, अभ्यासाच्या सोयीसाठी कथांचे वर्गीकरण करण्यात आलेले आहे. सुरुवातीला मराठी कथेचा प्रारंभ, नवकथेचे स्वरूप व मनोहर तल्हार यांच्या समकालीन कथाकारांचा आढावा घेण्यात आलेला आहे. प्रकरणाच्या शेवटी निष्कर्षात कथेच्या वैशिष्ट्याची नोंद करण्यात आली. पाचव्या प्रकरणामध्ये मनोहर तल्हार यांच्या कादंबऱ्यांवर सविस्तर विवेचन करण्यात आलेले आहे. त्यांच्या पाचही कादंबऱ्यांमधील आशय व विषय वेगळा असून, त्यांच्या कादंबरीलेखनातील प्रेरणास्थळांची नोंद करण्यात आली आहे. त्यांच्या कादंबऱ्यांची वैशिष्ट्येही स्पष्ट स्वरूपात मांडलेली आहेत. त्यांच्या एकूण कादंबऱ्यांतील सामर्थ्याबरोबर मर्यादाही सांगण्याचा अभ्यासकाने प्रयत्न केलेला

आहे. प्रकरण सहावे हे समीक्षा व स्फुटलेखनाचे असून, त्यात ललितलेखन, समीक्षालेखन, चित्रपट स्तंभलेखन, व्यक्तिचित्रणे या प्रकारच्या लेखनावर विस्तृत विवेचन केलेले आहे. प्रकरण सातवे हे समारोपाचे असून, यात निष्कर्षांच्या स्वरूपात मनोहर तल्हार यांच्या वाङ्मयीन योगदानाबरोबरच सामर्थ्य व मर्यादाही सांगितलेल्या आहेत.

प्रबंधाच्या सुरुवातीला मनोहर तल्हार यांचे अलीकडील छायाचित्र, अखेरीस संक्षिप्त जीवनपरिचय, प्रकाशित साहित्य संपदा, प्राप्त वाङ्मयीन पुरस्कार, तथा मान-सन्मान, समीक्षात्मक लेखनकृतींची सूची, प्रकट मुलाखत, नियतकालिकांची यादी, आधारभूत ग्रंथसूची, संदर्भग्रंथसूची इत्यादींसह मनोहर तल्हार यांच्या हस्ताक्षराचा नमुनादेखील दिलेला आहे.

मनोहर तल्हार यांच्या समग्र साहित्याच्या चिकित्सक अभ्यासातून प्रकट होणारी प्रस्तुत अभ्यासकाची भूमिका सर्वांना मान्य असेल असे नाही. सौंदर्य हे वस्तुगत असते, त्याची अभिप्रीती व्यक्तिगत येते. त्याप्रमाणे वाङ्मयाच्या क्षेत्रात व्यक्तिपरत्वे भिन्न भूमिका असू शकतात. यामुळे वाङ्मयाच्या क्षेत्रात मतभेदालाही जागा असते, याची नम्र जाणीव प्रस्तुत अभ्यासकाला आहे. वाङ्मय, कलेच्या क्षेत्रात निर्णायक भूमिका असेलच असे नाही. तेव्हा मनोहर तल्हार यांच्या समग्र साहित्याचा प्रस्तुत अभ्यास निर्णायक स्वरूपाचा आहे, असा दावा नाही.

मात्र या अभ्यासामुळे मराठीतील एका दुर्लक्षित साहित्यिकाच्या समग्र साहित्यावर प्रकाश पडू शकेल आणि मराठी साहित्य-समीक्षेत मौलिक भर पडू शकेल असा विश्वास वाटतो.

## १.६ संशोधनविषयाचा आराखडा

मनोहर तल्हार यांच्या समग्र वाङ्मयाचे स्वरूप, त्यांच्या वाङ्मयातील विविधता, त्यांच्या वाङ्मयाचे विविध पैलू लक्षात घेऊन, प्रबंधलेखनासाठी काही अभ्यासघटक निश्चित केले व त्याआधारे संशोधनविषयाचा पुढीलप्रमाणे आराखडा तयार करून, अभ्यासाची दिशा निश्चित केली.

‘मनोहर तल्हार यांच्या समग्र साहित्याचा चिकित्सक अभ्यास’

प्रकरण पहिले : संशोधनविषयाचे महत्त्व, संशोधनपद्धती व संशोधनाची साधन-सामग्री

प्रकरण दुसरे : मनोहर तल्हार : व्यक्ती आणि वाङ्मय

प्रकरण तिसरे : मनोहर तल्हार यांची कविता

प्रकरण चौथे : मनोहर तल्हार यांचे कथावाङ्मय

प्रकरण पाचवे : मनोहर तल्हार यांचे कादंबरीलेखन

प्रकरण सहावे : मनोहर तल्हार यांचे स्फुटलेखन

प्रकरण सातवे : समारोप

परिशिष्टे

अ) १. मनोहर तल्हार यांचा संक्षिप्त परिचय

२. मनोहर तल्हार यांची वाङ्मय संपदा

३. मनोहर तल्हार यांची मुलाखत

ब) १. संदर्भग्रंथ

२. नियतकालिके

३. वर्तमानपत्रे

❁❁❁

**१.७ संदर्भ**


१. मनोहर मल्हार यांचे समग्र वाङ्मय

२. तत्रैव

३. मनोहर मल्हार, दै. लोकमत, साहित्यजग, १९९५, पृ. ८

४. गावंडे प्र. ल. : 'विशिष्ट ग्रंथकाराचा अभ्यास', भाषा व साहित्य संशोधन, खंड-१, पृ. ३७५.


❋❋❋